**नियमित दिवाणी दावा क्र.३१४/२०२२**

(सुब्राव पाटील वि. श्रीराम शिंगटे व इतर)
**CNR No.MHSO07-000408-2022**

## <u>निशाणी क्र.     खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ याने त्याच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द होऊन, त्यास म्हणणे व कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, त्यास कायदयाची अपुरी माहिती व ज्ञान असल्याने व दाव्यासंबंधीची इतर कागदपत्रे मिळेपावेतो कैफियत देण्यास विलंब झालेला आहे, तसेच दरम्यानचे काळात नोकरीच्या कामामुळे प्रतिवादीस त्याच्या वकिलांना भेटून हजर होऊन कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीचा असल्यामुळे त्याच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द होऊन त्याने अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्वीकारण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादीचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यास त्याच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीच्या विनंतीनुसार त्याच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द करुन त्यास त्याचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्ज रक्कम रुपये ५००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ याने खर्चाची रक्कम वादीला पुढील तारखेपर्यंत दयावी.

३. प्रतिवादी क्र.१ याने वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्याच्याविरुध्द झालेला 'एकतर्फा' आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच त्याने अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे.

PRIYANKA NAMADEV PATHADE

Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE
Date: 2024.07.10 17:32:18 +0530

(पी. एन. पठाडे)

दिनांकः– १०.०७.२०२४ ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर.

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. M. Gaddam |
| Court | - | 6th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 10.07.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 10.07.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 10.07.2024 |